# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २७/०५/२०२४

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे . राजापेठ अप. क्रं. ३०६/२४ कलम २७९,३३६ भा.द.वि.सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान | नँशनल इंडस्ट्री MIDC अमरावती | घटना ता. वेळ - दि. २६/०५/२४ चे ०६-०० वा. दरम्यान<br><br>दाखल ता. वेळ - दि. २६/०५/२४ चे १५-२२ वा. | मदन इश्वरराव अलोणे वय ४२ वर्ष धंदा नोकरी (सहाय्यक अभियंता) म.रा.वि.वितरण मर्यादीत कंपनी केंद्र MIDC अमरावती रा. मंगलधाम कॉलनी अमरावती | अशोक लि लॅन्ड कंपनीचा ट्रक क्र. MH ४४ U ७४७९ चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी MIDC विज वितरण केंद्रा अंतर्गत नँशनल इंडस्ट्री MIDC येथील LT वाहिनीचा ०१ PSC पोल अशोक लि. लॅन्ड कंपनीचा ट्रक क्र. MH ४४ U ७४७९ चा चालकाने धडक दिल्याने पोल वरील विद्युत तारा तोडल्याने महावितरण कंपनीचे अं. २५००० रू. चे नुकसान झाले आहे. अशा फि. च्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पो स्टे खो गेट 135/24 कलम 379 भादवी | महाजनपुरा भातकुली रोड अमरावती | 26/5/24 चे 09.45 वा दाखल 27/5/24 चे 12.41 वा | संदिप रुपलाल यादव वय 42 वर्ष रा कल्याण नगर गल्ली नं. 2 | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी आपला ट्रक एम एच 27 बी एल 1604 हा दि 26/5/24 रोजी 09.45 वा महाजनपुरा भातकुली रोड अम येथुन कँबीनला लाँक लावुन बहिनी कडे महाजनपुरा अम येथे गेले असता व दि 27/5/24 ला सकाळी 10.00 वा ट्रकची साफसफाई करीता आले असता वरिल प्रमाने माल अज्ञात चोराने चोरुन नेला फिुचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला दाखल व तपास अधिकारी पोउपनी गरुड सा पो स्टे खो गेट अम शहर |

## ➢ प्राणांतिक अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे . राजापेठ अप. क्रं. ३०७/२४ कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८ भा.द.वि. १३४,१७७ मोवाका | इरविन कडुन राजापेठकडे याणारा उडाणपुलाचे खाली राजापेठ अमरावती | घटना ता. वेळ - दि. २७/०५/२४ चे ११/४५ दरम्यान<br><br>दाखल ता. वेळ - दि. २७/०५/२४ चे १४/४९ वा. | आदीत्य पांडुरंगजी धादोड वय १८ वर्ष रा इ नखेगांव ता दारव्हा जि यवतमाऴ | ट्रकक्र एम एच ४६ ई-३११० चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की आज दि २७/०५/२४ रोजी सकाळी रोजी ११/४५ वा मी माझे भावाची दुचाकी स्प्लेन्डर गाडी एम एच २७ ए एक्स ८५९२ ने मी माझा मित्र ओम अशा देवानंद कुरडे व त्याचा मित्र पियुष राठोड असे फार्म भरून गाडगेनगर येथुन राजापेठ बसस्टँन्ड कडे जात असतांना ईरविन कडुन येणारे उडाणपुलाचे खाली उतरत असतांना मागुन भरधाव वेगाने व निष्काऴजीपणे येणा-या ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन जिवीतास कारणीभुत अशा रीतीने चालवुन मागुन धडक देवुन अपघात केला त्यमध्ये माझा मित्र पियुष राठोड हा जागीच मरण पावला व ओम याचे डावे पायाला गंभीर दुखापत करून सदर ट्रक चालक अपघातस्थळावरून पऴुन गेला करीता सदर ट्रक एम एच ४६ ई-३११० चालकाविरूद्ध माझी कायजेशीर तक्रार आहे .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट ं.वरून सदरचा गुन्हा दाखल |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ४८८/२०२४ कलम २९४, ३२४, ५०६ ब, ३४ भादवी | अंधविदयालय समोर अमरावती | घ ता वेळ दि. २६.०५. २०२४ चे २३.०० वा<br><br>रि ता वेळ दि. २७.०५. २०२४ चे ०१.१२वा | नावेद तबारक पटेल वय २६ वर्ष रा. कवठा खुर्द आसेगाव बाजार ता अकोट जि अकोला ह मु एस आर पी एफ कॉलनी | १ शानु शिंदे वय २३ वर्ष व त्याचा मित्र नाव माहित नाही रा. अंधविदयालय मागे अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातिल नमुद घ ता वेळी व ठिकानी यातिल फिर्यादी हा एकटा टु व्हिलर गाडीने जेवन करण्याकरिता अंधविदयालय समोरुन जात असतांना रोड दोन गाडयावर चार लोक झिक झॅक पध्दतीने गाडी चालवीत होते म्हणुन यातिल फिर्यादीने त्यांना गाडी कशी चालवीत आहे असे म्हटले असता त्यापैकी एका इसमाने अश्लील शब्दात शिवीगाळ केली त्यावर फिने त्यांना म्हटले कि शिवीगाळ का करता असे म्हटले असता त्यापैकी एका इसमाने फि ला गाटा मारला त्यामुळे फिचे रक्त निघाले तेथील लोकांनी त्या इसमाचे नाव शानु शिंदे वय २३ वर्ष रा. अंधविदयालय मागे अमरावती असे सांगितले व दुस.याचे नाव माहित नाही व यातिल आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.ठाणे सायबर अप.क्र.२३/२०२४ कलम ४१९, ४२० भादवि. ६६ (ड) | १२ बी परमार ले आउट अकोली रोड अमरावती | २६/०४/२०२४ चे ०७.०० वा पासुन १०/०५/२०२४ चे १०.०० पावेतो | संकेत विजय ढेंगे , वय ४२ वर्ष व्यवसाय नोकरी, शारदा नगर राजापेठ | व्हॉटसअप मो क्र चा धारक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांना दिनांक २२-०४-२०२४ ते ०९-०४-२०२४ दरम्यान यातील नमुद आरोपी व्हॉटसअप मो क्र चे धरकाने डिस्काउंट रेट वर श्ेअर मिळवुन देण्याचे व चांगले प्रॉफीट मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन तसेच बनावट अॅप वर आभासी शेअर आणि प्रॉफीट होत असल्याचे दाखवून तसेच वेगवेगळी कारणे सांगुन पैसे गुंतवनुकीचे नावाने फिर्यादीची एकुण ६,००,१००/- रु. ची फसवणुक केली आहे . |